# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## आयडीयल विभागाद्धारे बहिस्थ (External Mode) पद्धतीने पदवी व पदव्यूत्तर शिक्षणक्रमांच्या ONLINE प्रवेशाबाबत माहिती :

- शैक्षणिक वर्ष २०१७-१८
- प्रवेश - दि. ०१ जुलै, २०१७ ते
  दि. ३१ ऑगस्ट, २०१७

## ▪ विद्यापीठ परिचय :

### ❖ ध्येय :

समाज घटकांच्या सशक्त, सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी मार्गदर्शक दीप बनून सर्वसामान्यांमध्ये ज्ञानाचा प्रसार करणे, तद्वतच जागरुक संशोधक, तंत्रज्ञ, कुशल व्यावसायीक आणि नागरिक घडविण्यासाठी विद्यार्थ्यांना उपयुक्त दर्जेदार शिक्षण प्रदान करणे.

### ❖ स्थापना व मान्यता :

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना १९८९ चा विद्यापीठ कायदा क्र. 29 (University Act No. 29) अंतर्गत १५ ऑगस्ट १९९० रोजी जळगाव येथे झाली. उत्तर महाराष्ट्र विभागात उच्च शिक्षणासाठी सुवर्णसंधी उपलब्ध करुन देणे हे विद्यापीठाचे ध्येय आहे. गेल्या पंचवीस वर्षात विद्यापीठाने शिक्षणक्षेत्रात उच्च स्थान मिळवले आहे. अतिशय अल्प कालावधीत हा विकास केला आहे. विद्यापीठाचे प्रेरणास्थान असलेले विद्यमान मा. कुलगुरु प्रा. डॉ. पाटील पी.पी. व माजी कुलगुरु मा. डॉ. ठाकरे एन.के., मा. प्राध्यापक पाटील एस.एफ., मा. प्राध्यापक माळी आर.एस., मा. डॉ. पाटील के.बी., मा. प्राध्यापक मेश्राम एस.यु. यांच्या प्रयत्नांनी विद्यापीठाने वंचितांना व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना यशोशिखरावर पोहोचविण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत विद्यार्थ्यास शिक्षणाच्या संधी व रोजगार उपलब्ध करुन दिला आहे.

मनुष्यबळ विकास मंत्रालयामार्फत (HRD) होणाऱ्या National Institutional Ranking Framework (NIRF) द्वारे शैक्षणिक वर्ष २०१६ मध्ये भारतातल्या १०० अतीउच्च विद्यापीठांच्या गुणवत्तेत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव हे ५९ व्या स्थानी असल्याचे गौरविले गेले. तसेच " Careers 360°s" Magazine द्वारा २०१४-२०१५ मध्ये झालेल्या सर्व्हेक्षणात आपले विद्यापीठ भारतातील १०० अतीउच्च विद्यापीठांमध्ये २७ स्थानावर तर महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांकाचे विद्यापीठ म्हणून नावारुपास आले. २०१३ मध्ये 'India Today' द्वारा Nelson Research and Consultancy Company माध्यमातुन झालेल्या देशातील एकूण ६२० विविध विद्यापीठांच्या सर्व्हेक्षणात आपल्या विद्यापीठाने ४० वे स्थान प्राप्त केले होते.

विविध सेवा सुविधांनी युक्त असे गुणवत्ताधारक विद्यापीठ ज्याद्वारे संशोधनास अतिशय महत्वाचे स्थान दिले आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक MOU झालेले आहेत. विद्यार्थ्यांना संशोधनाद्वारे अतीउच्च स्थानापर्यंत झेप घेण्यासाठी पंखात बळ निर्माण करण्याचे काम विद्यमान कुलगुरु मा. डॉ. पाटील पी.पी. यांच्या महत्तम प्रयत्नाने अखंड सुरु आहे.

२०० हून अधिक महाविद्यालये व ३५ पेक्षा जास्त मान्यताप्राप्त संस्था विद्यापीठाशी संलग्नित आहेत. नॅकच्या पूनर्मुल्यांकनाद्वारे 'अ' दर्जाचे स्थान विद्यापीठास प्राप्त झाले आहे तसेच उच्च शिक्षण व परीक्षा पद्धतीच्या योग्य नियोजनासाठी नुकताच आएसओ '९००१-२००८' हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील गुणवत्ता मानांकन प्रमाणपत्र मिळाले आहे.

विद्यापीठाचा जवळपास ६५० एकरचा निसर्गरम्य असा परिसर आहे. जळगाव शहरापासुन ८ ते १० कि.मी. वर वसलेले आहे. विद्यापीठाच्या अखत्यारित (Jurisdiction) जळगाव, धुळे, नंदूरबार ह्या जिल्ह्यांचा समावेश होतो. विद्यापीठात विविध शैक्षणिक विभाग आहेत. या विभागांतर्गत पदविका ते पदव्युत्तर स्तरावरील अनेक शिक्षणक्रम व अभिनव असे शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. ज्यामुळे विद्यार्थ्यांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होण्यास मदत होते.

बरेचसे शिक्षणक्रम हे औद्योगिकदृष्ट्या (Industrial Oriented) राबविले जातात. विद्यापीठास आजपर्यंत अनेक बक्षिसे व मानांकने (Awards) प्राप्त झाले आहेत. 'अंतरी पेटवू ज्ञानज्योत' ह्या समर्पक ब्रीदवाक्यासोबत उच्च शिक्षण व संशोधनाच्या अनेक संधी विद्यार्थ्यांना मिळवून देण्यात विद्यापीठ नेहमीच अग्रेसर राहिलेले आहे.

### ❖ कार्यक्षेत्र (Juridiction) :-

विद्यापीठाचे कार्यक्षेत्र जळगाव, धुळे व नंदूरबार या तीन जिल्ह्यांपुरतेच मर्यादीत आहे. मात्र, विद्यार्थी हा देश-विदेशातून कोठूनही प्रवेश घेऊ शकतो.

### ❖ आयडीयल बहिस्थ (External Mode) विभागाची उद्दिष्टे :-

- ➢ समाजातल्या शेवटच्या घटकापर्यंत, शहरी, ग्रामीण व आदिवासी तसेच मागास भागातील विद्यार्थ्याच्या, शेतकरी व स्त्रीयांच्या गरजा लक्षात घेऊन उच्च व्यावसायिक, तांत्रिक, शिक्षण देण्याचे कार्य करणे.
- ➢ शिकण्याची इच्छा असणाऱ्या सर्वांना सहजपणे शिक्षण घेता येईल, अशी लवचिक व उपक्रमशील शिक्षणप्रणाली विकसित करणे.
- ➢ अनौपचारिक तसेच शैक्षणिक विस्तार सेवांच्या उपक्रमातून विविध कला कौशल्यांचा विकास करण्याकरिता गुणात्मक शिक्षण उपलब्ध करुन देणे.
- ➢ बदलत्या तंत्रज्ञानाशी समायोजन साधण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाद्वारे प्रशिक्षण देणे व व्यक्तिमत्व विकास घडवून आणणे.
- ➢ शैक्षणिक संधीपासून वंचित असलेल्या सर्व दूर्लक्षित समाज घटकांसाठी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देणे.
- ➢ गृहीणीना शिक्षण संधी उपलब्ध करुन देणे.

### ❖ शिक्षणक्रम वैशिष्टये व विद्यार्थी सेवा-सुविधा :-

- ○ विद्यापीठात स्वतंत्र विभाग प्रस्थापित करण्यात आला आहे.
- ○ प्रत्येक पदवी व पदव्युत्तर पदवीचा अभ्यासक्रम (Syllabus) उमविचाच असून अभ्यासक्रम हा विद्यापीठातील नियमीत अभ्यासक्रमच आहे. अभ्यासक्रमास विद्या परिषद व इतर प्राधिकरणांची मान्यता.
- ○ शिक्षणक्रमातील परीक्षेचा वार्षिक पॅटर्न (Annual Pattern).

- जळगाव, धुळे, नंदूरबार या तीनही जिल्ह्यात परीक्षा केंद्रांची सुविधा आहे.
- विद्यापीठात सुसज्ज ग्रंथालय सुविधा उपलब्ध आहे.
- ऑनलाईन प्रवेश ते गुणपत्रक मिळण्याची सुविधा www.nmu.ac.in/ideal.html या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- पदवी व पदव्युत्तर गुणपत्रक व पदवी प्रमाणपत्र उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे देण्यात येईल.
- विषयानुसार स्वयंअध्ययन साहित्य (Study Material) उपलब्ध करुन दिले जाणार आहे.
- विद्यार्थ्यांना शिक्षणक्रम पूर्ण करत असतांना येणाऱ्या अडचणींवर वेळोवेळी समुपदेशन केले जाते.
- गुणवत्ता संवर्धनासाठी खास प्रयत्न केले जातात.
- नोकरी, विविध स्पर्धा परिक्षा देण्यासाठी व नेट व सेट परीक्षा देण्यासही पात्रता आहे.
- भारतीय व आतंरराष्ट्रीय पातळीवरील ग्रेडींग सिस्टिमचा स्विकार केलेला आहे.
- आयडीयलच्या अभ्यासक्रमात Choice Base Credit System लागू करण्यात येत आहे.
- पुर्व प्राथमिक ते उच्च स्तरावर अध्यापन करणाऱ्या शिक्षक तसेच प्राध्यापक यांना शैक्षणिक पात्रता उंचावणेस व Additional Degree करण्याची सुवर्णसंधी आहे.
- नियमीत महाविद्यालयात काही कारणास्तव प्रवेश मिळू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाची संधी.
- विद्यापीठाच्या विविध योजनांतर्गत आर्थिक सुविधा कोणतीही नाही.
- सुवर्ण पदक किंवा विशेष प्राविण्य योजना लागू राहणार नाही.
- शिष्यवृत्ती लागू राहणार नाही.
- विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या सेवा सुविधा देण्यासाठी ऑनलाईन पोर्टल सेवा. त्याअंतर्गत पुढील सुविधांचा फायदा विद्यार्थ्यांना होतो.
    - पदवी व पदव्यूत्तर विविध शिक्षणक्रमांची माहिती डाऊनलोड करणे.
    - परीक्षेसंदर्भातील माहिती प्राप्त करणे. (ओळखपत्र /वेळापत्रक /हॉल टिकीट)
    - विविध अर्ज (उदा. टी.सी., मायग्रेशन, पेपर रिव्हॅल्यूएशन) डाऊनलोड करणे.
    - व्यावसायीक व शैक्षणिक अभ्यासक्रम व प्रमाणपत्रांची माहिती डाऊनलोड करणे.
    - नौकरी संदर्भातील माहिती डाऊनलोड करणे.
    - स्पर्धा परीक्षांबाबतची माहिती डाऊनलोड करणे

## ❖ प्रवेशास पात्रगट

- विद्यार्थी
- गृहीणी
- नोकरी व व्यवसाय करणाऱ्या महिला
- विविध क्षेत्रातील कर्मचारी (शासकीय/निमशासकीय)
- व्यावसायिक
- सामाजिक क्षेत्रात काम करणा-या व्यक्ती

## ❖ उपलब्ध शिक्षणक्रम संरचना व प्रवेश पात्रता/ पात्रतेविषयी सूचना

## उपलब्ध शिक्षणक्रम संरचना व प्रवेश पात्रता :-

| शिक्षणक्रम | प्रवेश पात्रता | माध्यम | परीक्षा पद्धती |
|---|---|---|---|
| **बी.ए.** | कोणत्याही मान्यताप्राप्त बोर्डाची १२ वी परीक्षा उत्तीर्ण किंवा समकक्ष असलेली पदवीका (बी. फार्मसी/एम.सी.व्ही.सी./डी.एड.) उत्तीर्ण | मराठी | वर्षातुन एकदाच अंतीम लेखी परीक्षा (वार्षिक) (ऑनलाईन / ऑफलाईन) |
| **बी.कॉम.** | कोणत्याही मान्यताप्राप्त बोर्डाची १२ वी परीक्षा उत्तीर्ण किंवा समकक्ष असलेली पदवीका (बी. फार्मसी/एम.सी.व्ही.सी./डी.एड.) उत्तीर्ण | मराठी / इंग्रजी | |
| **एम. ए. - मराठी**<br>**एम.ए. - हिंदी**<br>**एम. ए. - इंग्रजी** | कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण किंवा समकक्ष असलेली पदवी उत्तीर्ण | मराठी<br>हिंदी<br>इंग्रजी | |
| **एम.ए. - इतिहास**<br>**एम.ए.- समाजशास्त्र**<br>**एम.ए. - राज्यशास्त्र**<br>**एम.ए. - अर्थशास्त्र**<br>**एम.ए.- संरक्षण व सामरिकशास्त्र** | | मराठी | |
| **एम.कॉम.** | कोणत्याहीमान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण किंवा समकक्ष असलेली पदवी उत्तीर्ण | मराठी/ इंग्रजी | |
| **एम.ए. - शिक्षणशास्त्र** | ▪ कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची शिक्षणशास्त्र विषयातील बी.ए. पदवी उत्तीर्ण (किमान ५०%)<br>▪ कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड.) उत्तीर्ण (किमान ५०%)<br>▪ बी.ए., बी.एड. (एकात्मिक) उत्तीर्ण किंवा बी.एस्सी., बी.एड. (एकात्मिक) उत्तीर्ण (किमान ५०%) | मराठी | अंतर्गत कार्यात स्वाध्याय, सेमीनार व प्रात्याक्षिक कार्य आहे .द्वितीय वर्षास संशोधन कार्य व मौखिक परीक्षा तसेच वर्षातुन एकदाच अंतीम लेखी परीक्षा (वार्षिक) (ऑनलाईन / ऑफलाईन) |
| एल.एल.एम. | ▪ कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची एल.एल.बी. पदवी उत्तीर्ण (किमान ५०%) | इंग्रजी | अंतर्गत कार्यात स्वाध्याय, सेमीनार व प्रात्याक्षिक कार्य आहे .द्वितीय वर्षास संशोधन कार्य व मौखिक परीक्षा तसेच वर्षातुन एकदाच अंतीम लेखी परीक्षा (वार्षिक) (ऑनलाईन / ऑफलाईन) |

## ❖ उपलब्ध शिक्षणक्रम व शुल्क (प्रती वर्ष )- २०१७-१८

•

| शिक्षणक्रम | विषय | शिक्षणक्रमाचे एकुण शुल्क (प्रती वर्ष) | परीक्षा शुल्क (प्रती वर्ष) | एकूण शुल्क (प्रती वर्ष) | स्वयं अध्ययन साहित्य उपलब्धता |
|---|---|---|---|---|---|
| बी.ए. प्रथम वर्ष | सामान्य | 3000/- | 500/- | 3500/- | **पुस्तके आहेत** |
| बी.ए. द्वितीय वर्ष | सामान्य | 3000/- | 500/- | 3500/- | हिंदी,इंग्रजी, इतिहास , राज्यशास्त्र , अर्थशास्त्र , समाजशास्त्र हे **CD/SOFT COPY माध्यमात उपलब्ध तर** मराठी , मानसशास्त्र **अध्ययन साहित्य उपलब्ध** नाही |
| बी.ए.तृतीय वर्ष | सामान्य | 2300/- | 500/- | 2800/- | **नाही** |
| बी.कॉम. प्रथम वर्ष | सामान्य | 3050/- | 550/- | 3600/- | English,Computing Skills,Modern Office Management, Principles & Practices of Banking हे **CD/SOFT COPY माध्यमात उपलब्ध तर** मराठी , Micro Economic Analysis, Financial and Cost Accounting **अध्ययन साहित्य उपलब्ध** नाही |

| शिक्षणक्रम | विषय | शिक्षणक्रमाचे एकुण शुल्क प्रती वर्ष | परीक्षा शुल्क | एकूण शुल्क | स्वयं अध्ययन साहित्य उपलब्धता |
|---|---|---|---|---|---|
| बी.कॉम. द्वितीय वर्ष | सामान्य | 3050/- | 550/- | 3600/- | MacroEconomic Analysis,Corporate Accounting & Costing **अध्ययन साहित्य उपलब्ध** नाही.<br>**तर**<br>बाकी विषय **CD/SOFT COPY माध्यमात उपलब्ध** |
| बी.कॉम. तृतीय वर्ष | सामान्य | 2300/- | 550/- | 2850/- | नाही |
| एम.ए. प्रथम वर्ष<br>व<br>द्वितीय वर्ष | मराठी, | 4500/- | 750/- | 5250/- | प्रथम वर्ष **पुस्तके आहेत**<br>**तर**<br>द्वितीय वर्ष साठी **CD/SOFT COPY माध्यमात उपलब्ध** |
| | हिंदी | 4500/- | 750/- | 5250/- | |
| | इंग्रजी | 4500/- | 750/- | 5250/- | |
| | इतिहास | 4500/- | 750/- | 5250/- | |
| | राज्यशास्त्र | 4500/- | 750/- | 5250/- | |
| | अर्थशास्त्र | 4500/- | 750/- | 5250/- | |
| | समाजशास्त्र | 4500/- | 750/- | 5250/- | |
| | संरक्षण व सामरिक शास्त्र | 3500/- | 750/- | 4250/- | प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष **स्वयं अध्ययन साहित्य उपलब्धता** नाही |
| एम.कॉम<br>प्रथम वर्ष<br>व<br>द्वितीय वर्ष | -- | 4500/- | 750/- | 5250/- | • **प्रथम वर्ष** Economics of Industries & Environment & Accountancy साठी **स्वयं अध्ययन साहित्य उपलब्धता** नाही **तर** बाकी विषय **CD/SOFT COPY माध्यमात उपलब्ध**<br>• द्वितीय वर्ष साठी सर्व विषय **CD/SOFT COPY माध्यमात उपलब्ध** |

| शिक्षणक्रम | विषय | शिक्षणक्रमाचे एकुण शुल्क प्रती वर्ष | परीक्षा शुल्क | एकूण शुल्क | स्वयं अध्ययन साहित्य उपलब्धता |
|---|---|---|---|---|---|
| एल.एल.एम. प्रथम वर्ष | कायदा व विधी | 10000/- | 1000/- | 11000/- | प्रथम वर्ष **CD/SOFT COPY माध्यमात उपलब्ध** |
| एल.एल.एम. द्वितीय वर्ष | | 8000/- | 1000/- | 9000/- | द्वितीय वर्ष **स्वयं अध्ययन साहित्य उपलब्धता** नाही |
| एम.ए. (शिक्षणशास्त्र) प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष | शिक्षणशास्त्र | 10000/- | 1000/- | 11000/- | प्रथम वर्ष **पुस्तके आहेत तर** द्वितीय वर्ष साठी **CD/SOFT COPY माध्यमात उपलब्ध** |

**(टिप : बहुतांश साहित्य हे मराठी माध्यमातून व अपवादात्मक विषयाचे इंग्रजी माध्यमातून उपलब्ध)**

❖ **द्वितीय व तृतीय वर्षास पदवी व पदव्यूत्तर शिक्षणक्रमाचे** स्वयं अध्ययन साहित्याच्या छपाईसाठी मोठ्या प्रमाणात तांत्रिक अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे **आपणांस शिक्षणक्रमानुसार छपाई केलेली पुस्तके सध्या उपलब्ध करुन देऊ शकत नाही. त्याऐवजी सदर शिक्षणक्रमांतर्गत असलेल्या अध्ययन साहित्याची सि.डी. मात्र आपणांस आम्ही उपलब्ध करुन देत आहोत**

## ❖प्रवेश पात्रता व शिक्षणक्रम प्रक्रियेबाबत सूचना

१. कला शाखेचा विद्यार्थी कला व वाणिज्य शाखेकडील शिक्षणक्रमास प्रवेश घेण्यास पात्र.

२. विज्ञान शाखेचा विद्यार्थी कला, वाणिज्य शाखेकडे प्रवेश घेण्यास पात्र आहे.

३. वाणिज्य शाखेचा विद्यार्थी कला शाखेकडे प्रवेशास पात्र राहिल.

४. **मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्याना टी. सी. विद्यापीठाकडून दिला जात नाही. म्हणून ज्या पदवीस विद्यार्थ्यास प्रवेश हवा असेल, त्या पूर्वी जी पदवी विद्यार्थ्याने प्राप्त केलेली आहे त्या पदवीचा ओरीजनल टी.सी. / एल.सी. तसेच विद्यापीठाचे ओरीजनल मायग्रेशन सर्टिफिकेट विद्यार्थ्याने प्रवेश घेतेवेळी जमा करणे अनिवार्य आहे.**

५. डी.एड. प्रवेशित असतांना विद्यार्थ्यास एफ.वाय.बी.ए./ बी.कॉम. ला प्रवेश घेता येईल.

६. एका विषयात पदवी पूर्ण केली आहे व दुसऱ्या विषयात पदवी करायची असेल तर द्वितीय वर्षाला प्रवेश दिला जाणार नाही.

७. इतर नियमीत विद्यापीठातून एफ.वाय.बी.ए. / एम.ए. प्रथम वर्ष पूर्ण केले असेल, तर आपल्याकडे एस.वाय.बी.ए./ एम.ए. द्वितीय वर्षाला प्रवेश दिला जाणार नाही.

८. एकदा प्रवेश घेतला तर, कोणत्याही सबबीवर प्रवेश रद्द केला जाणार नाही व विद्यार्थ्यास शुल्कही परत केले जाणार नाही.

१०. विद्यार्थ्याने Online प्रक्रियेद्वारे प्रवेश अर्जावर ज्या केंद्राचे नाव टाकले आहे, त्याच केंद्रावर विद्यार्थ्याने अर्ज जमा करणे अनिवार्य आहे. Online प्रवेश यादीनुसार विद्यार्थ्याच्या नावापुढे ज्या अभ्यास केंद्राचे नाव आहे तेच अंतिम गृहीत धरले जाईल.

११. प्रवेश पात्रता व शिक्षणक्रम अंमलबजावणी प्रक्रियेबाबत होणारे बदल स्विकारणे विद्यार्थ्यांना व संबंधीत अभ्यासकेंद्रांना बंधनकारक राहील.

१२. विद्यार्थ्यांच्या कोणत्याही विनंतीवरुन किंवा सबबीवरुन नंतर अभ्यासकेंद्र बदलून दिले जाणार नाही. फक्त अपवादात्मक संबंधीत केंद्रावर पुरेशी विद्यार्थी संख्या शिक्षणक्रम निहाय नसेल तर, विद्यार्थ्यास कोणते केंद्र देता येईल याबाबतचा अंतीम निर्णय आयडीयल विभागाचा राहील.

१३. विद्यार्थ्यांनी ज्या केंद्रावर प्रवेश घेतला आहे. त्याच केंद्रावरुन स्वयं अध्ययन साहित्य विद्यार्थ्यास वितरीत केले जाईल. कोणत्याही विद्यार्थ्यास वैयक्तीकरित्या साहित्य पाठविले जाणार नाही.

१४. **एम.ए. शिक्षणशास्त्र व एल.एल.एम. शिक्षणक्रमात अंतर्गत कार्यात सेमीनार व प्रात्याक्षिक कार्य आहे तसेच द्वितीय वर्षास संशोधन कार्य व मौखिक परीक्षा असते. त्यासाठी मार्गदर्शनाची गरज असते म्हणून विद्यापीठात एम.ए. शिक्षणशास्त्रासाठी व एल.एल.एम.साठी जळगाव व धुळे येथे मार्गदर्शनासाठी सोय राहील. त्यासाठी एकूण १५ दिवसांचे सत्र असते**

## ❖ प्रवेश प्रक्रिया :-

१. www.nmu.ac.in/ideal.html ही वेबसाईट ओपन करा.

२. तुम्हाला शिक्षणक्रमाची यादी दिसेल

३. त्यानंतर शिक्षणक्रम यादी मधून तुम्हाला ज्या शिक्षणक्रमाला प्रवेश घ्यावयाचा तो शिक्षणक्रम निवडा.

४. त्या शिक्षणक्रमाच्या नावावर क्लिक करा.

५. त्या नंतर ऑनलाईन प्रवेश अर्ज ओपन होईल.

६. ऑनलाईन अर्ज भरणे.

७. ऑनलाईन भरलेला अर्ज डाऊनलोड करणे.

८. सोबत दिलेल्या चलनामध्ये हाताने माहिती भरुन चलन द्वारे प्रवेश शुल्क नमूद केल्यानुसार जवळच्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या शाखेत (जळगाव, धुळे व नंदूरबार जिल्ह्यातील ) दिलेले चलन भरावे.

९. जे केंद्र निवडले असेल त्या केंद्रावर ऑनलाईन भरलेला प्रवेश अर्ज व शुल्क भरल्याची पोहच पावती तसेच संबंधीत कागदपत्रे जमा करावीत.

## ❖प्रवेश अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे

| एफ.वाय.बी.ए. / बी. कॉम | एम.ए./एम.कॉम./ एम.ए. (शिक्षणशास्त्र) /एल.एल.एम. |
|---|---|
| • १२ वी चे मुळ प्रमाणपत्रक व गुणपत्रकाच्या झेरॉक्स साक्षांकीत (ॲटेस्टेड) प्रत<br>• फोटो (एक)<br>• ओरिजीनल टी.सी. / एल.सी .<br>• नावात बदल असेल तर गॅझेटच्या झेरॉक्स साक्षांकीत (ॲटेस्टेड) प्रत<br>• जन्म तारखेचा उल्लेख असलेले कोणत्याही कागदपत्राची झेरॉक्स साक्षांकीत (ॲटेस्टेड) | • पदवीचे मुळ प्रमाणपत्र व गुणपत्रकाच्या झेरॉक्स साक्षांकीत (ॲटेस्टेड) प्रत<br>• फोटो (एक)<br>• ओरिजीनल टी.सी. / एल.सी. देणे अनिवार्य<br>• नावात बदल असेल तर गॅझेटच्या झेरॉक्स साक्षांकीत (ॲटेस्टेड) प्रत<br>• जन्म तारखेचा उल्लेख असलेले कोणत्याही कागदपत्राची झेरॉक्स साक्षांकीत (ॲटेस्टेड) प्रत<br>• नोकरीत असाल तर संबंधीत अधिकारी यांचे नाहरकत प्रमाणपत्र (NOC)<br>• इतर विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना मुळ स्थलांतर दाखला देणे अनिवार्य |

## ❖आयडीयलची प्रवेश केंद्रे

| अ.क्र. | प्रवेश केंद्रे | सांकेतांक | फोन नं. |
|---|---|---|---|
| १. | **मा. संचालक,** आयडीयल,उमवि, जळगाव | १०१ | ०२५७-२२५७४९५/ २२५८४९६ |
| २. | **मा. संचालक,** प्रताप तत्त्वज्ञान केंद्र, अमळनेर, जि. जळगाव | १०३ | ०२५८७-२२२२८० |
| ३. | **मा. संचालक,** म. गांधी तत्त्वज्ञान केंद्र, स्टेशन रोड, धुळे, जि. धुळे | २०१ | ०२५६२-२४०६४१ |
| ४. | **मा. संचालक,** एकलव्य प्रशिक्षण केंद्र, सरस्वती कॉलनी, तळोदा रोड, नंदूरबार, जि. नंदूरबार | ३०१ | ०२५६४-२३००२८ |

- सदर प्रवेश केंद्रे ही फक्त प्रवेश अर्ज जमा करण्यासाठीच आहे.
- कृपया ऑनलाईन भरलेला अर्ज ज्या जिल्ह्यातील (जळगाव/धुळे/नंदूरबार) प्रवेश केंद्रावर जमा करणार आहात त्या केंद्राचे नाव लिहावे.त्यानंतर आपणांस कोणत्याही सबबीवर केंद्र बदलून दिले जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

- **संपर्कासाठी पत्ता व फोन नं. :**

**मा. संचालक,**

आयडीयल बहिस्थ (External Mode) विभाग

**स्पर्धा परीक्षा इमारत, उमवि नगर, जळगाव- ४२५ ००१**

कार्यालय : ०२५७-२२५७४९५/२२५८४९६

वेबसाईट : www.nmu.ac.in/ideal.html

किंवा

www.nmu.ac.in ही वेबसाईट ओपन करा व होमपेजवर हाताच्या डाव्या बाजूस IDEAL या Link वर Click करा.